राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ/४६६७/२०२१/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| ॲड.विशाल अशोक शिंदे | नायब तहसीलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे | तहसीलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे |

<u>ऑनलाईन सुनावणी दिनांक १० जानेवारी २०२४</u>

अपिलार्थी यांनी दि.२५.१०.२०२१ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने द्वितीय अपील दाखल करताना "माहिती दिली नाही" असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस उप जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी (Nodal Officer), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे व अपिलार्थी हजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दि.२२.०८.२०२१ रोजीचा आहे, सदर अर्जात दि.११.०८.२०२१ रोजीचे प्राथमिक सर्वेक्षणाची जाहिर प्रकटनाची संपूर्ण कामकाजाची माहिती मिळणेबाबत अर्ज केला आहे.
२. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असे कथन केले की- "जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी माहिती दिली. नाही "
३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२९.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती शुल्क भरण्याबद्दल सुचित केले होते.
४. अपिलार्थीचे प्रथम अपील दि.१४.०९.२०२१ रोजीचे असून त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांनी दि.२०.१०.२०२१ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रत्यक्ष पाहणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
५. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय आदेशाची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा

भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थींने जोडपत्र "अ” मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

२. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरील आदेशाची अंमलबजावणी विहीत मुदतीत होईल याची दक्षता घ्यावी.

३. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपील आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने, त्यांचेविरुद्ध अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

४. समन्वय अधिकारी (नोडल अधिकारी) यांनी वरील आदेशाची विहित कालावधीत अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घ्यावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित-

१) जिल्हाधिकारी,पुणे जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२०१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश संबंधितास बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.

२) समन्वय अधिकारी (Nodal Officer) तथा,उप जिल्हाधिकारी,पुणे जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे